**प्रकरण 2 (पुस्तिका – 1)**
**प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.)**
**संस्थेची संरचना, कामे व कर्तव्याबाबतचा तपशील**

**2.1 सार्वजनिक प्राधिकरणासाठी उद्देश / उद्दिष्टे :-**

दूर अंतरावरून वेगवेगळया जलस्त्रोतांतून पाणी आणून व त्यावर प्रक्रीया करून मुंबईतील शहरवासीयांना पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करण्यासाठी वेगवेगळे प्रकल्प हाती घेणे. व नियोजन करणे. प्रकल्पांचे बांधकाम करून कार्यान्वित करण्यासाठी तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन करणे. नवीन जल स्त्रोतांच्या विकासाचे काम, प्रकल्प सुसाध्यता, बोगदयांचे तपशीलवार नियोजन, निविदा मागविणे व बांधकाम, नवीन जलवाहिन्या टाकणे, नवीन उदंचन केंद्रे बांधणे, उपकेंद्रांचे बांधकाम, जलप्रक्रिया केंद्राचे बांधकाम (हरिनीकरण संयंत्रे अंतर्भूत धरुन) या बाबींसाठी नियोजन करणे तसेच अतिरिक्त पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी सेवा जलाशय बांधणे आणि समान जलवाटपासाठी, जलवितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी जलवाहिन्या टाकणे, या उपरोक्त उद्दिष्टांचा कामांमध्ये अंतर्भाव करुन मुंबईच्या नागरिकांसाठी तदनुषंगिक कामे हाती घेणे.

**2.2 सार्वजनिक प्राधिकरणासाठी ठोस विधान / अभियान :-**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार असलेल्या मानकांपेक्षाही चांगल्या दर्जाचे स्वच्छ आणि पिण्यास योग्य असलेले पाणी मुंबई शहरातील तसेच मुंबई उपनगरांतील, आणि मुंबई सभोवतालच्या उपग्रहीत नगरातील भिन्न पाणी पुरवठा विभागांकरिता पुरविण्याची व्यवस्था करणे. हे जल वाटप जागतिक आरोग्य संघटनेच्या मागदर्शक तत्वानुसार सम जलवितरण व्यवस्थेवर आधारलेले असून मुंबईच्या वाढीव लोकसंख्येची गरज भागविण्यासाठी त्याप्रमाणे पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयात वाढ करणे.

**2.3 इतिहास आणि संबंधित माहिती :-**

मुंबई शहर आणि उपनगरे यांची झपाटयाने वाढ झाल्यामुळे,सातत्याने वाढत्या पाण्याच्या मागणीसाठी अतिरिक्त पुरवठा करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन पाणी पुरवठा प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.) (आरंभीचे प्रकल्प अभियंता) हा स्वतंत्र कक्ष उघडणे गरजेचे ठरले. या कक्षातून केल्या जाणा-या कामांत पुढील विनिर्देशीत गोष्टी समाविष्ट आहेत. राज्य आणि केंद्र शासनाकडून विविध बाबींसाठी मंजूरी मिळविणे, भूमिसंपादन करणे, जलस्त्रोतांचा विकास करण्यापासून ते शहरे, पूर्वउपनगरे, पश्चिम उपनगरे यातील सेवा जलाशयापर्यंत, मानकाप्रमाणे उत्तम प्रतीचे पाणी आणणे. सद्याच्या पाणी पुरवठा प्रकल्पात ब-याच गुंतागुंतीच्या तांत्रिक प्रक्रियांचा अंतर्भाव आहे. या तंत्रज्ञानातील सर्वच बारकाव्यांची अद्ययावत माहिती महापालिकेतील अभियंत्यांना उपलब्ध

असतेच असे नाही आणि म्हणून प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तज्ञांकडून सेवा/किंवा सल्लागारांकडून सेवा घेतली जाते. पाणी पुरवठा पद्धतीत वाढ करण्यासाठी, कराव्या लागणा-या सर्व प्रकल्पांची सुसाध्यता, नियोजन आणि संकल्पन सल्लागारांकडून केले जाते. जल स्त्रोतांच्या विकासाची कामे सल्लागारांच्या सहयोगाने या विभागाकडून बघितली जातात. जसे कामाचे स्वरुप असेल, त्याप्रमाणे, ही सर्व कामे संपूर्णपणे कक्षातील कर्मचा-यांच्या सहाय्याने किंवा प्रकल्प सल्लागार/ तज्ञ यांच्या मदतीने पार पाडली जातात.

## 2.4 कर्तव्ये :-

आवश्यकता असेल तेव्हा सल्लागारांची नेमणूक करुन खालील कर्तव्ये पूर्णत: महानगरपालिकेच्या कर्मचारीवृदांकडून अथवा प्रकल्प सल्लागार/तज्ञांमार्फत पार पाडली जात आहेत. कामाच्या स्वरुपावर आधारीत आवश्यकता असेल तेव्हा सल्लागारांची नेमणूक केली जाते. प्रकल्पांचे नियोजन करुन अंमलबजावणीसाठी आवश्यकतेप्रमाणे सुसाध्यता, नियोजन, संकल्पन, अंदाज, निविदा दस्तऐवज, सल्लागाराने तयार केलेल्या निविदा मागविणे, सल्लागाराने छाननी करुन शिफारस केलेल्या निविदांना वरिष्ठ अधिका-यांची मंजूरी प्राप्त करणे, काम प्रदान करणे इ.कामे सल्लागारांच्या शिफारसीनुसार पार पाडली जात आहेत. विभागांतर्गत आणि महाराष्ट्र शासन, भारत सरकार, पर्यावरण आणि वनमंत्रालय, नागरी विकास महामार्ग प्राधिकरण,जागतिक बँक,मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यासारख्या वित्तीय संस्था अशा विभागांबाहेरील अभिकरणांसमवेत समन्वय साधणे. ही सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करणे आणि कंत्राट अटीनुसार कामाची गुणवत्ता बघणे हे या खात्यात काम करणा-या कर्मचा-यांचे मुख्य कर्तव्य आहे. वरील कामे राबविण्यासाठी लागणा-या तांत्रिक बाबींसाठी मदत पुरविणे, हे देखील ह्या खात्यात काम करणा-या कर्मचा-यांचे कर्तव्य आहे. सल्लागार / तज्ञ यांच्या कामातील प्रगतीचा अभिलेखही कर्मचा-यांना ठेवावा लागतो. याच कक्षातून त्यांच्या कामावरही देखरेख ठेवली जाते व उपरोक्त कामांसाठी अंदाजपत्रकात योग्य ती आर्थिक तरतूद करणे.

## 2.5 मुख्य कामे / कार्यक्रम :-

पाण्याच्या दर्जाच्या मानकानुसार, पाणी पुरवठा करण्यासाठी, टप्प्यांप्रमाणे, विविध प्रकल्पाच्या कार्यान्वितीसाठी योजना निश्चित करणे आणि संकल्पित करणे.


## 2.6 पुरविल्या जाणा-या सेवांची सूची :-

मुंबईच्या पाणी पुरवठ्यामध्ये वृद्धी करण्यासाठी नवीन योजना तयार करण्याची जबाबदारी या विभागाची आहे. प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करणे, तपशीलवार प्रकल्प तयार करणे, आवश्यक असणा-या मंजू-या मिळविणे, सल्लागारांची नेमणूक करणे व त्यांच्याशी समन्वय साधून त्यानंतर निविदा तयार करणे व मागविणे, कंत्राट देण्यापर्यंतची कामे करणे.

सध्या गारगाई, पिंजाळ योजना वृध्दिगंत करण्याचे काम प्राथमिक अभियांत्रिकी पातळीवर चालू आहे.

**2.7 संघटनेचा रचनात्मक आराखडा**

**संरचनात्मक तक्ता मुख्य कार्यालय**




**2.8 जनतेकडून अपेक्षा :-**

वेळापत्रकानुसार प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्वसामान्य जनतेकडून सहकार्य अपेक्षित आहे.

**2.9 जनतेच्या सहभागासाठी व्यवस्था :-**

अशी वेगळी व्यवस्था करण्यात आलेली नाही. तथापि,नागरिकांना जर प्रकल्पातील कामे पहावयाची असतील,तर कामाच्या ठिकाणी त्यांच्या स्वखर्चाने आणि अधिका-यांच्या योग्य परवानगीनंतर भेटीचे आयोजन केले जाईल.

**2.10 सेवा तत्परता आणि नागरिकांची गा-हाणी सोडविण्यासाठी रचना :-** प्रकल्प कामासाठी हे लागू नाही. तथापि, नियुक्त केलेला अधिकारी, जर तक्रारी असल्या,तर नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेईल आणि उत्तरे देईल.

Sd/-07.02.2019

**प्रशासकीय अधिकारी (पापुप्र) वरळी**